जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
[illegible]1 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यार्थीकेंद्री गुणवत्ता अभियान



शिवाजी विद्यापीठाने गेल्या वर्षापासून विद्यार्थीकेंद्री गुणवत्ता अभियान सुरू केले आहे, यावर्षी या अभियानाची व्याप्ती वाढवण्यात येणार आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून नवीन विद्यापीठ कायदा अस्तित्वात येणार आहे. त्याची अमंलबजावणी करण्याचे आव्हान असेल. त्यादृष्टीने विद्यापीठाने तयारी सुरू केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी कौशल्यावर अधारित अभ्यासक्रम तसेच चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टिम (सीबीसीएस) विद्यापीठाच्या शिक्षणामध्ये लागू करणाऱ्यांवर भर देण्यात येणार आहे. विद्यार्थी गुणवत्तापूर्ण बनण्याबरोबरच रोजगारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी विद्यापीठ पुढील वर्षामध्ये प्रयत्नशील राहणार आहे. प्लेसमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या आहेत. त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. विद्यापीठाने केलेल्या नावीन्यपूर्ण कामाबद्दल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध पुरस्कार मिळवले आहेत. यावर्षीही या यशाची पुनरावृत्ती करण्यावर भर दिला जाईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाठी नेहमीच प्रयत्नशील राहू.

**- डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 JAN 2017

सकाळ

# ‘आविष्कार’ महोत्सवात पाच संशोधकांचे यश

## विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठातर्फे विद्यापीठस्तरीय ‘आविष्कार’ संशोधन महोत्सवात वाणिज्य व व्यवस्थापन विभागातून पाच संशोधकांनी यश मिळविले. पदव्युत्तर गटामध्ये एम.कॉम्. भाग एकच्या तेजस्विनी सूर्यवंशीने मानव्यविद्या शाखेमधून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिने बचत गटांच्या अभ्यासावर सादरीकरण केले. संशोधक विद्यार्थी गटामध्ये पीएच.डी.चा विद्यार्थी अनिकेत जाधवने प्रथम, तर एम.फिल.चा विद्यार्थी महमद रियाज फणीबंद याने द्वितीय क्रमांक पटकाविला. दोघांनीही वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा शाखेअंतर्गत यश मिळविले.

अनिकेतने ‘बँक कर्मचाऱ्यांची वित्तीय साक्षरता, महमदने महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीवर तोडग्या संबंधी सादरीकरण केले. हे दोघे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करत आहेत.

शिक्षक गटातून अधिविभागातील एन. यू. खामकर यांनी वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा या शाखेमध्ये प्रथम व एस्. व्ही. काटकर यांनी शास्त्रा शाखेमध्ये तिसरा क्रमांक मिळविला. खामकर यांनी ‘ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावर संगणकीय प्रणालीद्वारे उपाययोजना’ व काटकर यांनी ‘संगणकशास्त्र माध्यमातून सोलर सेलचे विद्युत निकष’ विषयावर सादरीकरण केले. विजेत्या संशोधकांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी विद्यापीठातर्फे निवड झाली आहे.

- 1 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'आविष्कार'मध्ये कॉमर्स विभागाला चार पारितोषिके

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामार्फत विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सव-"आविष्कार' स्पर्धा विद्यापीठाच्या लोककला केंद्रामध्ये आयोजित करण्यात आला होत्या. या स्पर्धेत पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व शिक्षक या तीन गटांमध्ये झाल्या. या स्पर्धेत वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाने पाच पारितोषिके प्राप्त केली.

पदव्युत्तर गटामध्ये एम्. कॉम्. भाग एकच्या तेजस्विनी सूर्यवंशी या विद्यार्थीनीने मानव्यविद्या शाखेमधून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांनी बचत गटांच्या अभ्यासावर सादरीकरण केले. संशोधक विद्यार्थी गटामध्ये पीएच. डी. चे विद्यार्थी अनिकेत जाधव यांनी प्रथम क्रमांक तर एम्.फिलू.चे विद्यार्थी महमद रियाज फणीबंद यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या दोघांनीही वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा या शाखेअंतर्गत यश प्राप्त केले. अनिकेत जाधव यांनी ‟बँक कर्मचाऱ्यांची वित्तीय साक्षरता" या विषयावरील संशोधनाचे सादरीकरण केले तर फणीबंद यांनी महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीवर तोडग्या संबंधी सादरीकरण केले.

शिक्षक गटामधून अधिविभागातील प्रा. एन्. यू. खामकर यांनी वाणिज्य , व्यवस्थापन व कायदा या शाखेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तर प्रा. एस्. व्ही. काटकर यांनी शास्त्रा शाखेमध्ये तिसरा क्रमांक प्राप्त केला. प्रा. खामकर यांनी 'ऊस उत्पादक शेतक-यांच्या समस्या व त्यावर संगणकीय प्रणालीद्वारे उपाययोजना' या विषयावर सादरीकरण केले. प्रा. काटकर यांनी 'संगणकशास्त्र माध्यमातून सोलर सेलचे विद्युत निकष' या विषयावर सादरीकरण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 JAN 2017

सकाळ

दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

# डॉ. भालेराव, साकळे यांचे विद्यापीठात मंगळवारी व्याख्यान

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि इतिहास अधिविभागातर्फे ३ जानेवारीला सकाळी साडेअकरा वाजता व्याख्यान होणार आहे. इतिहास अधिविभागामध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ व प्रतिबंध' विषयावर शारीरबोध संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षा राजश्री साकळे व्याख्यान देतील. सर्वांनी व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. पद्मजा पाटील यांनी केले आहे. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि समान संधी कक्षातर्फे मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता व्याख्यान होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे 'भारतीय संविधान आणि समान संधी' विषयावर प्राचार्य डॉ. हरिष भालेराव व्याख्यान देतील. सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 1 JAN 2017

तरुण भारत

# विद्यापीठात उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्राचा उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे सोमवार २ जानेवारी रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. सोमवारी सकाळी १० वाजता विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे प्रा. एन. डी. पाटील यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचे बीजभाषण होणार आहे. डॉ. गो. मा. पवार, डॉ. टी. एस. पाटील प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत; तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी आहेत, अशी माहिती पत्राद्वारे प्रसिद्ध केली आहे.

पहिल्या चर्चासत्रात 'बहुजन संकल्पनेचे आविष्कार' या विषयावर प्रा. गो. मा. पवार, तर 'महात्मा फुले यांची बहुजन संकल्पना' या विषयावर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले मार्गदर्शन करणार आहेत. 'महर्षी शिंदे यांची बहुजन संकल्पना' या विषयावर पुणे येथील सदा डुंबरे मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बहुजन संकल्पना' या विषयावर नवी दिल्ली येथील डॉ. गोपाळ गुरू मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रात 'बहुजनवादाची संकल्पना आणि सद्यःस्थिती' या विषयावर पुणे येथील प्रतिमा परदेशी मार्गदर्शन करणार आहेत; तर 'बहुजनवादी संकल्पनेचे राजकारण' या विषयावर डॉ. प्रकाश पवार; तर 'महर्षी शिंदे यांची बहुजनदृष्टी आणि सद्यकालीन इतिहासलेखन' या विषयावर डॉ. अवनीश पाटील मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थान डॉ. किशोर बेडकीहाळ भूषवणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

-1 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# कम्प्युटर देणार आयुष्याला गती

Maruti.Patil
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

**कोल्हापूर** : अंध, विकलांग, मूकबधीर, गतिमंद मुलांना शिक्षणाचा समान हक्क देवून त्यांना संगणकीय ज्ञान देऊन रोजगारक्षम बनवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये 'समावेशी शिक्षण संसाधन केंद्र' सुरू करण्यात येणार आहे. यासाठी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाच्यावतीने (रुसा) १५ लाख रुपयांचा निधी मिळाला असून सेंटरची उभारणी युद्धपातळीवर सुरू आहे. या सेंटरचे उद्घाटन सहा जानेवारी रोजी होणार आहे. विद्यापीठाच्या महत्त्वाकांक्षी सेंटरमुळे विद्यार्थ्यांना अनेक पुस्तकांच्या वाचनाबरोबरच स्पर्धेच्या युगात रोजगारासाठी सक्षम बनता येणार आहे.

**विकलांग मुलांसाठी विद्यापीठात विशेष प्रकल्प**

स्टडी सेंटर फॉर व्हिज्युअलच्या माध्यमातून बॅ. खर्डेकर ग्रंथलयामध्ये ब्रेल लायब्ररी सुरू केली होती. या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्याशाळेच्या माध्यमातून हजारो अंध विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. संगणक प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी विषयावर झालेल्या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी आत्मनिर्भर बनले. या उपक्रमाची दखल घेऊन इंडियन असोसिएशन फॉर द ब्लाइंडने 'सिल्व्हर झोन' व थर्ड वर्ल्ड स्टडीज साउथ एशिया चॅपटरकडून ब्रेल लायब्ररीला पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

ब्रेल लायब्ररीने घेतलेल्या अल्पावधीतील भरारीची रुसाने दखल घेऊन १५ लाख रुपयांचा निधी दिला. अंध, विकलांगांना या सेंटरच्या माध्यमातून उभारी देण्यासाठी सेंटरच्या निर्मितीला चालना देण्यात आली. यासाठी ग्रंथालयाच्या स्टडी रुममध्ये सेंटर उभारणीचे काम युद्धपार्तळीवर सुरू आहे. सेंटरमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी लायब्ररी सायन्स पदवी व तंत्रज्ञानांची माहिती असलेल्या तंत्रज्ञ आणि विशेषज्ञांची नेमणूक प्रक्रिया सुरू केली आहे. सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हवा त्या पुरस्तकाची ब्रेल लिपीमध्ये प्रिंट मिळणार आहे. तर ऑडिओ रेकॉर्डिंगच्या माध्यमातून सिडीज् देण्यात येणार आहे. सेंटर मार्फत ही सर्व सुविधा मोफत पुरवण्यात येणार आहे.शिवाजी विद्यापीठाच्या या महत्त्वाकांक्षी सेंटरचे उद्घाटन रुसाच्या संचालिका मीता लोचन व इशरात जहाँन यांच्या हस्ते सहा जानेवारी रोजी होणार आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

### अद्ययावत साहित्य

सेंटरमध्ये दहा संगणक संच, जॉब ॲक्सेस वेग स्पेस, लॉ व्हिजन, डिव्हाइसेस, पर्ल कॅमेरा फॉर स्कॅनिंग, इएल ब्रेल नोट टेकर, मराठी-हिंदी पुस्तकांसाठी ओसीआर स्वॉफ्टवेअर अशी अद्ययावत साहित्यांचा समावेश आहे.

### मोफत सुविधा

इएल ब्रेल नोट टेकरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ब्रेल लिपी किंवा ऑडिओमध्ये रुपांतर करून त्यांना सीडीज् देण्यात येणार आहेत. यासाठी सुमारे दोन लाख किमंतीचा स्वतंत्र प्रिंटर बसवण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना हवे असलेले पुस्तक त्यांच्या संग्रही राहणार आहे. सेंटरकडे विद्यार्थी नोंदणी केल्यानंतर सर्वच विद्यार्थ्यांना मोफत सुविधा दिली जाणार आहे.

**ब्रेल लायब्ररीच्या माध्यमातून विद्यापीठाने राष्ट्रीयस्तरावर आपला ठसा उमटवला आहे. या उपक्रमाची दखल घेऊन राज्यात केवळ चार सेंटरची परवानगी मिळाली असून त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. यासाठी रुसाकडून १५ लाख रुपयांचा निधी मिळाला असून लवकरच सेंटरचे उद्घाटन होणार आहे.**

**- डॉ. नमिता खोत, सेंटर समन्वयक**



**शुभवार्ता**